॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

फेब्रुवारी २०२१


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org


## २७ फेब्रुवारी
## मराठी भाषा गौरव दिन



ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी

वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस

त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून

२७ फेब्रुवारी हा दिवस ‘मराठी भाषा गौरव दिन’

म्हणून साजरा होतो.

## पाकोळी बालवाडी – पुणे, भेकराईनगर

पालकांशी व विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद होण्यासाठी ‘घरोघरी संपर्क’ या उपक्रमाने नवीन वर्षाची सुरुवात शिक्षिकांनी केली. मुलांनी केलेल्या वह्या, रंगवलेली चित्रे, हस्तव्यवसायातील वस्तू इ. बघून शिक्षिकांनी मुलांचे व पालकांचे कौतुक केले. पालक त्यांना आलेल्या अडचणी मनापासून सांगत होते. भ्रमणध्वनीचा वापर मुलं जास्त करतात हे जाणवले. त्यामुळे पालकांना योग्य मार्गदर्शन व्हावे या हेतूने ८ जानेवारीला वर्धिनीत पालक सभा झाली. समुपदेशन विभागाच्या सौ. मेघाताई नगरे यांनी पालकांशी संवाद साधला.

मुलांना अभ्यासक्रमानुसार चित्रफीती पाठवल्या. यातील विशेष म्हणजे संक्रांतीची माहिती सांगणे, पतंगाचे चित्र रंगवणे, २६ जानेवारीसाठी देशभक्तिपर गाणे म्हणणे, राष्ट्रध्वज रंगवणे, इत्यादी.

प्रजासत्ताक दिनाला वर्धिनीत प्रभागाच्या नगरसेविका सौ. पल्लवीताई जावळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. बालवाडीच्या मुलांना उपस्थित राहता आले नाही पण पालकांनी मुलांनी रंगवलेले राष्ट्रध्वज, सादर केलेले राष्ट्रगीत यांच्या चित्रफीती गटावर पाठवल्या.

वर्धिनीत १६५ मुलांची व भेकराईनगरला ४० मुलांची दि १ ते ४ फेब्रुवारी या दिवसांमध्ये कोरोनाची सर्व काळजी घेऊन आरोग्य तपासणी झाली. डॉ. मेघना, डॉ. वैष्णवी वावरे, डॉ. स्नेहा पाटील यांनी सहकार्य केले. उंची, वजन तपासून त्यांच्या तक्रारी समजून घेऊन त्यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

यावर्षी मुलांचा संक्रांत उत्सव साजरा न झाल्याने पालकांनी गाणी, गोष्टी, पोवाडे, नाच यांच्या विशेष सादरीकरणाच्या चित्रफीती गटावर पाठवल्या. त्यांच्या कल्पकतेचे, उत्साहाचे सगळ्यांनी विशेष कौतुक केले.













## महिला विभाग – 'समर्पण दिन'

दि. ११ जानेवारीला वर्धिनीच्या ओंकार सभागृहात कै. किशाभाऊ पटवर्धन जन्मशताब्दी वर्ष साजरे करताना महिला विभागाचा महामेळावा झाला. रुग्ण सहाय्यक वर्ग, शिवणवर्ग, बालवाडी, बचतगट, साक्षरता वर्ग या सर्व उपक्रमातील आजी–माजी विद्यार्थिनी, शिक्षिका दुपारी २ ते ५ या वेळात सहभागी झाल्या. प्रथम विभागश: एकत्रिकरणात कामातील विशेष अनुभवांची व वर्धिनीच्या कामात स्वत:चा सहभाग कसा असेल यावर मांडणी झाली. प्रत्येक विभागातील माजी विद्यार्थिनींनी आपले मनोगत सादर केले, –सौ. माधुरी काळे, श्री. सुनिल– रुग्णसहाय्यक वर्ग, सौ. नायडू, सौ. तस्लीम शेख– बालवाडी शिक्षिका, सौ. रंजना बांदल– बचतगट, सौ. उषा केदारी– शिवणवर्ग. नंतर मा. श्री. शिरिष आपटे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. त्यांनी समर्पण म्हणजे काय, ते कसे असले पाहिजे, हे दैनंदिन जीवनातील दाखले देत सांगितले. ते म्हणाले. ''आपण रोजच्या कामात शरीराने दमतोच पण मनानेही दमतो ते आपल्या लक्षात येत नाही. काम करत असताना काही वेळा आपली ऊर्जा कमी होत असते ही उर्जा भरून काढण्यासाठी वेगळे नवीन विचार ऐकण्याची, स्विकारायची आवश्यकता असते. ती अशा कार्यक्रमातून येते. समर्पण करताना स्वयंप्रेरणेने, स्वेच्छेने, सत्कार्यासाठी, समष्टीसाठी, सातत्याने, सर्वांच्या सहभागाने, समन्वय राखत, तन–मन–धन अर्पून केल्याने समाज परिवर्तन घडून येते.''








## रुग्ण सहाय्यक वर्ग

दि. ८ जानेवारीला वैद्य लीनाताई बावडेकर यांचे 'स्वयंपाकातील औषधी पदार्थ' या विषयावर व्याख्यान झाले. या पदार्थांचे औषधी गुणधर्म आपले आरोग्य चांगले राखण्यासाठी कसे उपयोगी पडतात, हे यातून लक्षात आले. मुलींच्या प्रश्नांनी हे व्याख्यान खूपच रंगले. ताईंनी सर्वांच्या शंकांचे निरसन केले.

दि. ३१ जानेवारीला झालेल्या पल्स पोलिओ अभियानात सर्व मुली सहभागी झाल्या. २००० पेक्षा जास्त मुलांना डोस दिला. सामाजिक कामाचा आनंद मुलींना यातून घेता आला.

दि. १ फेब्रुवारीपासून रोजच्या अभ्यासाबरोबर दवाखान्यातील प्रत्यक्ष कामाचे प्रात्यक्षिक के.ई.एम. रुग्णालयात सुरू झाले. वेगवेगळ्या विभागात काम करताना मुलींचे प्रशिक्षण उत्तम पद्धतीने होत आहे.

## शाखा विभाग – कार्यवृत्त प्रकाशन

दि. ७ फेब्रुवारीला स्व-रूपवर्धिनीजवळच्या सौदामिनी सभागृहात रा. स्व. संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री. सुहासराव हिरेमठ यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वार्षिक कार्यवृत्त प्रकाशन' व विशेष गुणवत्ता दाखवणाऱ्या युवांना 'माडगावकर पुरस्कार प्रदान' कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला वर्धिनीचे कार्यकारिणी सदस्य, कार्यकर्ते, आजी-माजी वर्धक वर्धिका, हितचिंतक व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.







## माडगावकर पुरस्कार प्राप्त युवा

| | | |
|---|---|---|
| माध्यमिक गट | आदित्य दिवटे | स्वामी दयानंद शाखा |
| | गायत्री मोरे | भगिनी निवेदिता शाखा |
| उच्च माध्यमिक गट | समृद्धी यादव | भगिनी निवेदिता शाखा, शाखा प्रमुख |
| | प्रणव पोळ | स्वामी दयानंद शाखा, शाखा प्रमुख |
| पदवीधर गट | केतन क्यादर | स्वामी श्रद्धानंद शाखा |
| | मुरली गायकवाड | जनता वसाहत शाखा, शाखा प्रमुख |

मा. सुहासराव हिरेमठ यांनी मार्गदर्शन करताना त्यांचे प्रचारक म्हणून काम करतानाचे अनुभव सांगितले. या अनुभवातून, 'प्रेम आणि आत्मियता ह्या गोष्टी संघटनेच्या कामाचा प्राण आहेत. अशा पद्धतीने प्राण ओतून, झोकून देऊन, भक्तिभावाने केलेले काम टिकून राहते. त्याग व सेवा भारतीय मनाचे आदर्श गुण आहेत. यामुळे समाजाबद्दलची कळकळ सतत जागी राहते.' किशाभाऊंच्या व्यवहार व कृती यातून केलेले मार्गदर्शन सर्वांना उपयोगी पडत आहे. वर्धिनीतून उच्च प्रतीचे काम त्यांनी उभे केले पण त्याचे श्रेय त्यांनी कधीही घेतले नाही. नित्यनेमाने असे काम करणे खूप अवघड आहे. यातूनच सर्व कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळते आणि अवघडही सोपे होऊन जाते.' या शब्दात त्यांनी किशाभाऊंची ओळख जागवली.

## उत्थान विभाग (वस्ती विकास प्रकल्प)

**कलामंच सांस्कृतिक कार्यक्रम –** उत्थान विभागांतर्गत कला मंचाचे उद्घाटन करण्यात आले. ज्या मुलामुलींना एखादी कला अवगत करायची आवड आहे अशा मुलांना ती शिकवणे व ज्या मुलामुलींना कला अवगत आहे अशा मुलांचे संघटन करणे या उद्देशाने हा कलामंच स्थापित झाला. प्रजासत्ताक दिनादिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ गायिका सौ. अपर्णा केळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात मागील दोन महिने केलेल्या सरावाचे सादरीकरण करण्यात आले. शाखा–अभ्यासिकांमधील मुले व युवांनी गायन, वादन, नृत्य व निवेदन यांचा सुरेख नजराणा सादर केला. यामध्ये 'ने मजसी ने... या गीताचे गायन अहिल्या धायगुडे ताईने व 'मै रहू या ना रहू...' या गीताचे गायन मृणाल सुतार या ताईने केले. छोटा उस्ताद रैभ्य जामदारने सुरेख बंदिश गायली. समृद्धी व मृणाल यांनी गायलेल्या जोशपूर्ण गोंधळाने वेगळाच माहोल तयार झाला. यानंतर कौशिक केळकर व सुयश काब्दुले या दोघांच्या तबला व मृदुंगाच्या जुगलबंदीवर सर्वांनी ठेका धरला. कार्यक्रमाचा शेवट 'अबीर गुलाल उधळीत रंग' या हरी दादाच्या अभंगाने झाला.









## समुपदेशन विभाग

**पालक कट्टा –** पाकोळी बालवाडीच्या दि. ८ जानेवारीच्या पालकसभेत पालकांशी 'मुलांचा भ्रमणध्वनी (मोबाईल) वापर' या विषयावर संवाद झाला. ❋ मुलांना सातत्याने कृतीशील खाद्य देत राहिले पाहिजे. ❋ मुलांना वाचनाची आवड लागावी म्हणून रोज एक गोष्ट सांगावी. ❋ पालकांनी मुलांना जास्त वेळ द्यावा. ❋ पालकांनी भ्रमणध्वनी कमी वापरला तरच मुलांचा वापर कमी होईल. ❋ दिवसभरातल्या विविध कामांमध्ये मुलांना सहभागी करून घ्यावे.

**कार्यशाळा –** ✻ दि. १६ जानेवारी रोजी उत्थान प्रकल्पातील कार्यकर्त्यांसाठी वेगवेगळ्या खेळातून मुलांशी संवाद कसा करावा याचे प्रशिक्षण झाले.

✻ दि. २२ डिसेंबर २० ते २ जानेवारी २१ अशी ११ दिवसांची शाखेतील आठवी ते अकरावी या वयोगटातील युवतींची ‘वयात येतानाचे शारीरिक व मानसिक बदल’ – पंचकोश, सौंदर्य, आरोग्य, मैत्री–प्रेम–आकर्षण, व्यसने, लैंगिक दुर्वर्तन, परस्पर पूरकता, प्रसारमाध्यमे या विषयांचा संदर्भ घेऊन कार्यशाळा झाली. यात काही कृतिसत्रे, प्रसंग नाट्य सादरीकरण, न आवडणाऱ्या पदार्थांची पाककला स्पर्धा झाली.

**बुद्धिमापन चाचणी –** स्वामी विवेकानंद आणि स्वामी अभेदानंद शाखेतील १५० मुलांची व स्वामी ब्रह्मानंद शाखेतील २० मुलांची चाचणी झाली. निकाल तयार करून मुलांना मार्गदर्शनही होत आहे.

**इतर उपक्रम –** ‘मासिक पाळी’ या विषयावर चित्रफीत तयार करून वर्धिनीच्या यु–ट्यूब चॅनेलवर जोडला गेला.







## अभिनंदन

✻ शेकडो अनाथ मुला–मुलींना मायेने वाढवणाऱ्या ‘माई’ अर्थात **सिंधुताई सपकाळ** आणि भटक्यांचे जीवन जगणाऱ्या पारधी समाजाच्या आक्रोशाला आपल्या कामातून वाचा फोडणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवी ‘काका’ अर्थात **गिरिषराव प्रभुणे** यांना **पद्मश्री पुरस्काराने** सन्मानीत केल्याबद्दल त्यांना संस्थेच्या वतीने विनम्र अभिवादन!

✻ आपल्या लेखणीतून आणि कामातून विज्ञानाची दृष्टी जागवणाऱ्या पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांचे ९४व्या मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन आणि अभिवादन!

❖❖❖